ओम शांति .

मुलुंड सबज़ोन से सम्बन्धित तलेगांव दाभाडे राजयोग हॉल में 3 ऑक्टोम्बर को प्रोग्राम हो गया

सुख शांती एवं समृद्धि का मार्ग सहज राजयोग उसके फोटो भेज रहे है.दीप प्रज्वलन करते समय

**आदरणीय भ्राता - बी.के.बृजमोहनजी.बी.के.लाजवंतीबहन ,बी.के.भारतीबहेन .सरलाबहेन ,प्रभाबहेन**

**प्रमुख मेहमान - 1) संजय भेगडे (आमदार-मावळ ) 2) कृष्णराव भेगडे .(मावळ भूषण माजी आमदार ) 3) चित्राताई जगनाडे (नगराध्यक्ष ) 4) राजेंद्र पटवा (प्रेसिडेंट,लायन्सक्लब) 5) संगीता जाधव( प्रेसिडेंट,इनरव्हील क्लब चंद्रकांत शेटे (प्रेसिडेंट बालविकास विदयालय) 6) स्नेहल बाळसराफ.(समाजसेविका) 7) श्रीकांत जातेगावकर.(फिजिशियन,हृदयरोग तज्ञ,)**

स्त्रियांचा सन्मान केला तर समाज ख-या अर्थाने सुखी - ब्रम्हकुमार बृजमोहन भाईजी

एमपीसी न्यूज - योगद्वारे मनावर नियंत्रण मिळवल्यास आत्मशांती अनुभवता येते. आत्मज्ञानाने मनुष्य सुखी होतो. आत्मा परमात्मा ओळखता यायला हवा. ब्रह्मकुमारी संस्थेतर्फे हे ज्ञान देण्याचे कार्य अविरत सुरू आहे. स्त्रियांचा सन्मान केला तरच समाज ख-या अर्थाने सुखी होतो, असे मार्गदर्शन ब्रम्हकुमार बृजमोहन भाईजी यांनी योग विषयावर केले.

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातर्फे तळेगाव दाभाडे येथे सुख शांती समृद्धीचा मार्ग राजयोग या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. माऊंट आबू येथील प्रजापिता ब्रम्हकुमारी संस्थेचे अतिरिक्त सचिव ब्रम्हकुमार बृजमोहन भाईजी यांनी योग विषयावर प्रवचनातून अनमोल मार्गदर्शन केले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मावळचे आमदार संजय(बाळा) भेगडे, माजी आमदार कृष्णराव भेगडे, नगराध्यक्षा चित्रा जगनाडे आणि ब्रम्हकुमारी लाजवंती दिदी उपस्थित होत्या. तर परूळेकर विद्यालयाच्या स्नेहल बाळसराफ, नगरसेविका निता काळोखे, विरोधी पक्षनेत्या हेमलता खळदे, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा संगीता जाधव, उपनगराध्यक्ष सुनील शेळके, उद्योजक दिलिपभाई शहा, बालविकास विद्यालयाचे अध्यक्ष चंद्रकांत शेटे, डॉ. श्रीकांत जातेगांवकर, माजी नगराध्यक्षा मीरा फल्ले, लायन्स क्लबचे राजेंद्र पटवा आदी उपस्थित होते.

येथील योगीराज हॉलमध्ये प्रमुख पाहुण्यांचे स्वागत आणि नृत्यगीताने कार्यक्रमास सुरुवात झाली. सरला दिदींनी प्रास्ताविक केले. संस्थेच्या कार्याची ओळख आणि योगद्वारे मनाला सकारात्मक बनवण्याचे महत्व सांगितले.

आमदार संजय (बाळा)भेगडे आपल्या भाषणात म्हणाले की, संस्थेच्या अध्यात्मिक कार्यक्रमास उपस्थित राहण्याची संधी मला मिळाली हे

माझे भाग्य समजतो. ब्रम्हकुमारी संस्थेचे कार्य प्रशंसनीय असून माउंट आबू, राजस्थान येथे सोलर सिस्टीमद्वारे विद्युत निर्मिती करणारी ही जगातील एकमेव संस्था आहे. यापुढे संस्थेच्या कार्यासाठी आवश्यक ती मदत केली जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

गहन शांतीच्या प्रत्यक्ष अनुभूतीने कार्यक्रमाची सांगता झाली. बिंदिया दीदी यांनी सूत्रसंचलन केले. तर प्रभा दिदींनी आभार मानले.

Thanks & |Regards.

Talegaon Dabhade.

B.K.Prabha.

talegaondabhade@bkivv.org